# उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी कार्यालय मलकापुर

प्रशासकीय इमारत, मलकापुर ता. मलकापुर जि. बुलडाणा
दुरध्वनी क्रमांक – ०७२६७-२२२१२२ ई-मेल : sdomalkapur@rediffmail.com

क्रमांक अ.का./भूसंपादन/कावि-४७८/२०१७ दिनांक :-०८/०८/२०१७

## "कलम १९ अधिसूचना"

भूसंपादन प्रकरण क्रमांक **एल.ए.क्यु./पलसोडा/०४/२००९-१०**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम(१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक १६०० अ दिनांक ११/०५/२०१६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्हयाच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी **"पुनर्वसाहत क्षेत्र"** म्हणून निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड(छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी बुलडाणा, यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची – 1

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गाव : पलसोडा तालूका : नांदुरा जिल्हा : बुलडाणा

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| 1 | १७० | ०.४५ |
| 2 | १८८ | ०.५३ |
| | एकुण | ०.९८ हे.आर. |

संपादनाचे प्रयोजन :- जिगांव प्रकल्पा अंतर्गत बुडीत क्षेत्रात जाणा-या मौजे पलसोडा ता. नांदुरा जि. बुलडाणा या गावाचे पुनर्वसनासाठी मौजे पलसोडा येथील क्षेत्र ०.९८ हे. आर. जमीनीचा वाढीव भूसंपादन.

Scanned by CamScanner

अनुसूची :- 2

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :- जिगांव प्रकल्प (मोठा प्रकल्प)

प्रकल्पकार्याचे वर्णन :- जिगांव प्रकल्प बुडीत क्षेत्रात जाणाऱ्या मौजे पलसोडा ता. नांदुरा या गावाचे पुनर्वसनासाठी

समाजाला मिळणारे लाभ :- या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

अनुसूची :- 3

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गांव :- पलसोडा, तालुका :- नांदुरा जिल्हा :- बुलडाणा

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अनुसूची :- 4

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

निरंक

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी कार्यालय मलकापुर येथे निरीक्षण करता येईल.

दिनांक : 06/07/2017

ठिकाण : बुलडाणा.

उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी मलकापुर

जिल्हाधिकारी बुलडाणा.

Scanned by CamScanner